# भटक्या भराडी जमातीचे शैक्षणिक व आर्थिक वास्तव : एक समाजशास्त्रीय अध्ययन

**प्रा. डॉ. गणेश नत्थूजी बहादे.**

**सहाय्यक प्राध्यापक**

**समाजशास्त्र विभाग प्रमुख**

**श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर, ता. हिंगणघाट, जि. वर्धा**

**मो. नं. 9049673164 – ईमेल- ganeshbahade94@gmail.com**

**सारांश (Abstract) :**

भारतीय समाजात जवळपास सहा हजारापेक्षा जास्त जातीचे लोक वास्तव्य करतात त्यापैकी पाचशे भटक्या आणि अर्ध भटक्या जमाती आहेत असे भटक्या जातींच्या संदर्भात २००५ मध्ये नियुक्त केलेल्या राष्ट्रीय आयोगाने म्हटले आहे. प्राचीण काळात भारतावर आक्रमण करणाऱ्या शक, हून, पठाण, मंगोले इत्यादींनी आक्रमण करून मुळ रहिवाशांचा पराभव केला ते रानोवणी भटकत राहिले, त्यांच्या वंश विस्तार हाच काही भटक्या जमातींचा उद्यांचा इतिहास. इतिहास जरी वेगवेगळा असला तरी भारतात भटक्या जामाती, विमुक्त जाती, अर्ध्या भटक्या जातींची लोकसंख्या जवळपास अकरा कोटी इतकी आहे. महाराष्ट्रात त्या विमुक्त जाती १९८ व ३०८ भटक्या व अर्थ भटक्या जमाती आहे. त्यांची सांस्कृतिक परंपरा इतर जाती समूहा पेक्षा वेगळी आहे. ब्रिटीशांनी अशाच काही भटक्या जातींचा गुन्हेगार जातीमध्ये समावेश केला मात्र स्वातंत्र्या नंतरही लोक त्यांच्या कडे गुन्हेगार म्हणूनच बघतो.

भारतीय समाज अनेक जाती- जमाती मध्ये विभागल्या गेला असून प्रत्येक जाती - जमातीची समाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थिती समान नाही. मानव हा सामाजिक प्राणी आहे असे अँरीस्टाटल यांनी म्हटले आहे त्यामुळे मानवाने अनेक क्षेत्रात प्रगती केली आहे. आर्थिक आणि शैक्षणिक विकासामुळेच जैविक प्राण्याचे रुपांतर सामाजीक प्राण्यानमध्ये झाले म्हणूनच शिक्षणा विषयी महात्मा ज्योतिबा फुले म्हणतात कि, "ज्या शिक्षणामुळे माणसाला खर काय आणि खोट काय हे कळत ते म्हणजे शिक्षण होय". या वरून हे स्पष्ट होते कि शिक्षणामुळेच मानवाला नाविन्यता प्राप्त होते. काय स्वीकारावे काय स्वीकारू नये ह्याची जाणीव शिक्षणाने होते.

**बीज संज्ञा (Key-Words):**

शैक्षणिक स्थिती, आर्थिक स्थिती, सामाजिक स्थिती.

**प्रस्तावना (Introduction)-**

महाराष्ट्रात अनेक दृष्टीने दुर्लक्षित राहीलेला समाज म्हणजे भराडी, नाथजोगी, वासुदेव गोंधळी, वाघ्या, मुरळी, पोतराज इत्यादी बारा लोक सांस्कृतिक माध्यमातून हा समाज परिचयाचा आहे परंतु देशाच्या अनेक प्रदेशात विखुरलेला हा समाज म्हणजे भराडी समाज अनेक समस्यांच्या विळख्यात सापडलेला आहे. नागपूर परिसरात या समाजाची संख्या बरीच मोठी आहे. परंतु तो एका ठिकाणी स्थिरावल्याचा दिसून येत नाही. तो स्वतः च्या व कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी सतत कोठे ना कोठे भटकंती करीत असतो. म्हणजेच आज इथे, उद्या तिथे अशीच त्यांची काहीशी अवस्था आहे. भटकंती करीत असलेला भराडी समाज इतर जातीपेक्षा अगदी वेगळा आहे, त्या समाजाकडे उपजीवेकेसाठी कोणत्याही प्रकारचे साधन नसल्यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाहासाठी त्यांच्या भटकंतीच्या काळात उघड्यावर पाल टाकून राहतात, एवढेच नाही तर, गाव, वस्ती पासून दूर कोठेतरी तंबू ठोकून राहतात, तेच त्यांचे निवास्थान असते.

देशात नाथ संप्रदायाला मानणारे लोक मोठ्या प्रमाणात आहे. यातील बरेचसे लोक नवनाथाला मानत असले तरी व्यवसायानुसार एक दुसऱ्यापासून वेगळे समजतात. काळानुसार त्यांचे वेगळेपण वेगवेगळ्या जमातीमध्ये विभाजित झाले. आप-आपसातील विवाह संबंध बंद झाले, त्यापैकी काही जमाती एका ठिकाणी वास्तव्य करू लागले तर काही जाती सतत भटकत राहिले, त्या भटक्या जमातीपैकी एक जमात म्हणजे "नाथजोगी" होय. विदर्भात त्यांना "भराडी", किंगरीवाले किंवा बालसंतोषी म्हणतात. किंगरीवाले गायन आणि वादन करून भिक किंवा भिक्षा मागतात तर नाथजोगी नाथाच्या नावाने वेश धारण करून भिक्षा मागतात तसेच बालसंतोशी लोकांचे भविष्य सांगतात. भटका असणारा भराडी समाज भविष्य व भिक्षा मागून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत असला तरी समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी सतत धडपड करीत आहे. (लोकसत्ता-२५/०४/२०१५).

भराडी समाजाला भटक्या जमाती (ब) मध्ये समावेश करून २.५% आरक्षण देण्यात आले. परंतु हा समाज केंन्द्रामध्ये इतर मागासवर्गीय जाती म्हणजेच OBC प्रवर्गात गणला जातो तर राज्यात भटक्या विमुक्त प्रवर्गात मोडल्या जातो त्यामुळे या समाजाला आरक्षणाचा फारसा फायदा होत नाही. विशेष म्हणजे हा समाज सतत भटकत असल्यामुळे जातीचे प्रमाणपत्र मिळत नाही कारण त्यासाठी त्यांना १९६१ चा जन्माचा पुरावा आवश्यक आहे.

१५ आगस्ट १९४७ भारत स्वतंत्र झाला. २६ जानेवारी १९५० ला भारताला संविधान मिळाले. आज पर्यंत अनेक पक्षाचे सरकार आले. परंतु दुर्लक्षित असलेल्या भराडी

समाजापर्यंत अनेक योजना पोहचवू शकले नाही. आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागास असलेल्या समाजापर्यंत शिक्षण पोहचण्या आधीच शिक्षनाचे खाजगीकरण झाले. सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागास असलेल्या भराडी समाजाचा शिक्षणाचा हक्क आणि अधिकार हिरावून घेतला. भारतीय राज्यघटनेच्या कलम ४६ अंतर्गत ०६ ते १४ वयोगटातील सर्व मुला - मुलीना मोफत आणि सक्तीचे शिक्षण केले. असे असले तरी, त्याची योग्य पद्धतीने अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून येते म्हणून भराडी समाजात साक्षरतेचे प्रमाण नाहीच्या बरोबरीचे आहे म्हणून भटक्या जमातीच्या म्हणजे भराडी समाजाची शैक्षणिक आणि सामाजिक स्तिथी काय आहे. याचा अभ्यास करण्याचे आणि वास्तव शोधण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध निबंधात करण्यात येत आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे -**

१) भराडी समाजातील लोकांच्या आर्थिक स्थितीचा शोध घेणे.
२) भराडी समाजातील शैक्षणिक स्थितीचा शोध घेणे.
३) भराडी समाजातील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

**संशोधन विषयाची गृहीतके -**

१) भराडी समाजातील शैक्षणिक स्थिती निम्न दर्ज्याची आहे.

२) भराडी समाजातील लोकांची आर्थिक स्थिती कमकुवत आहे.

**संशोधनाची क्षेत्र –**

प्रस्तुत शोध निबंधात संशोधकाने वर्धा जिल्यातील भराडी समाजाच्या आर्थिक व शैक्षणिक स्तिथी जाणून घेण्यासाठी वर्धा जिल्ह्यातील वडनेर, धानोरा आणि भगवा या तीन गावातील भराडी समाजातील वस्तीला प्रत्यक्ष भेट देऊन सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थितीचा शोध घेतेलेला आहे.

**संशोधन पद्धती –**

संशोधनाचे स्वरूप व आकलन होण्यासाठी संशोधाकाणे संशोधनात वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब केला आहे. म्हणून प्रस्तुत शोध निबंधात संशोधाकाने वर्णणात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब केला आहे.

**नमुना निवड –**

प्रस्तुत विषयावरील संशोधानासाठी नमुना निवड पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. संशोधानासाठी तीन गावातील ६० उत्तरदात्यांची निवड करण्यात आली आहे.

**तथ्य संकलन –**

भराडी समाजातील सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थितीची समस्या अभ्यासासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा अवलंब केला असून मुलाखत व प्रश्नावली, मासिके, इंटरनेट इत्यादीचा वापर करण्यात आला आहे.

**1) शैक्षणिक स्थिती -**

जगातील प्रत्येक देशाचा विकास हा त्या देशातील प्राथमिक ते उच्च शिक्षण यात असतो कारण प्राथमिक शिक्षणातून उच्च शिक्षणाची प्रेरणा प्रत्येक विद्यार्थ्यांना मिळत असते त्यातूनच संशोधन विकसित होत असते. त्यामुळे अनेक विकसित राष्ट्रे वैज्ञानिक आणि औद्योगिक द्रुष्ट्या विकसित होते, परंतु भारतातील स्थिती मात्र वेगळीच आहे. भारत जागतिक महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहत असतांना तळागळातील प्रत्येक व्यक्तीला प्राथमिक शिक्षण ते उच्च शिक्षण सक्तीचे व मोफत करणे तेवढेच महत्वाचे आहे. महाराष्ट्रातील सरकारी शाळांमधील शिक्षणाचा दर्जा अत्यंत दैनिय आहे. कधी शिक्षक असतो तर कधी विद्यार्थी राहत नाही कधी इंग्रजीचा, गणिताचा किंवा विज्ञानाचा देखिल शिक्षक राहत नाही तर कधी शिक्षकांना विना वेतन काम करावे लागते. त्यामुळे शिक्षण दर्जेदार होत नाही. त्याहून कायम वीना अनुदानित शाळामुळे तर गरीब कुटुंबातील मुलांचे फार नुकसान होत असल्याचे दिसून येते. सरकार शिक्षणातील गळतीचे प्रमाण कमी करण्याचे खूप प्रयत्न करीत आहे परंतु एवढे असूनही भराडी समाजाची आर्थिक व सामाजिक परस्थितीमुळे त्या समाजातील मुलांमध्ये शैक्षणिक गळतीचे प्रमाण सर्वाधिक आहे, कारण आर्थिक व सततच्या भटकंतीमुळे हा समाज शिक्षणाकडे फार कमी प्रमाणात आकर्षित होत आहे. एकंदरीत भटके जीवन, आर्थिक स्थिती स्थानिक पातळीवर शैक्षणिक असुविधा तसेच शिक्षणाचे न समजलेले महत्व इत्यादी मुळे भराडी समाजातील शिक्षणातील गळतीचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे प्रस्तुत अभ्यासावरून दिसून आले. (क्षेत्र सर्वेक्षण).

**भराडी समाजातील शिक्षणातील प्रमाण :**

| अ.क्र. | शिक्षण | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | निरक्षर | २५ | ४१.६६% |
| २ | बालवाडी /अंगणवाडी | १४ | २३.३३% |
| ३ | प्राथमिक | १५ | २५.००% |
| ४ | माध्यमिक | ०५ | ०८.३३% |
| ५ | उच्च माध्यमिक | ०१ | ०१.६६% |
| ६ | पदवी / पद्वुत्तर | ०० | ००.००% |
| | **एकूण :-** | **६०** | **१००.००%** |

सर्वेक्षित भराडी समाजाच्या कुटुंबातील एकूण ६० मुलांची शैक्षणिक स्थिती जाणून घेतली असता ४१.६६% मुल हे अंगणवाडी / बालवाडीमध्ये जातात, प्राथमिक शिक्षण २५% मुले घेतात तर माध्यमिक व उच्च माध्यमिक असे एकूण १०% मुले शिक्षण घेत असल्याचे दिसून आले. याचा अर्थ असा की, भराडी समाजातील ७०% मुले आजही शिक्षणा पासून वंचित असल्याचे दिसून येत आहे.

**2) आर्थिक स्थिती –**

भराडी समाज अठरा विश्व दारिद्र्यामुळे आजही ते पालात किवा पाड्यात राहतात. त्यांच्यात बदल घडवून आणण्यासाठी त्यांना राहण्यासाठी स्वत:च्या मालकीची जागा व पक्के घर, उदरनिर्वाहसाठी शेतीसारखे कायम स्वरूपी साधन त्यासाठी विहिरी करिता अनुदान, शेतीसाठी औजारे, मोटरपंप व खावटी साठी मदत इत्यादी घटक महत्वाचे आहे शासना कडून त्यांच्यासाठी अनेक योजना राबिवाल्या जातात या योजनेमध्ये भराडी समाजाचाही समावेश आहे. दारिद्र रेषेच्या यादी मध्ये नाव नसलेली किवा बीपीएल च्या यादीत त्यांना समावेश करण्यात आलेला नाही असे प्रत्यक्ष निदर्शनास आले त्यामुळे त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळत नाही किंवा त्यांना विकास योजने पासून वंचित राहवे लागते.

भराडी समजातील लोक निरक्षर व अर्धसाक्षर असल्यामुळे अकुशल काम करून आपला उदरनिर्वाह करित असतो त्यांच्याकडे रोजगाराचे कायम स्वरूपी साधन नसल्यामुळे मजुरी व रोजंदारीचे काम करतात, तर काही लोक शिकार व मासेमारी करून स्वत:ची पोट भरतात.

| | व्यवसाय | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शेती | ०१ | ०१.६६ % |
| २ | नोकरी | ०० | ००.०० % |
| ३ | धंदा | २१ | ३५.०० % |
| ४ | रोजमजुरी | ३८ | ६३.३३ % |
| | एकूण | ६० | १०० % |

प्रत्यक्ष सर्वेक्षणावरून भराडी समाजाच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेतला असता, असे निदर्शनात आले की, ६० पैकी ०१ व्यक्तीजवळ शेती आहे तेही सरकारकडून मिळालेली (शिलिंग). म्हणजेच ०१.६६ टक्के कुटुंबाकडे शेती आहे. सरकारी नोकरी

कोणाकडेही नसल्याचे दिसून आले. व्यवसाय २१ लोक करीत असून त्याचे प्रमाण ३५ टक्के आहे तर रोजमजुरी ३८ लोक करीत असून त्याचे प्रमाण ६३.३३ टक्के एवढे आहे.

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते कि, शेती केवळ एका व्यक्तीकडे असून तेही शिलिंगच्या माध्यमातून मिळाली आहे, त्यांच्याकडे शेती कसण्यासाठी कोणतेही साधने उपलब्ध नसल्यामुळे ती शेती पडित आहे, ३५ टक्के लोक व्यवसाय केवळ शेळी पालन, गोणे शिवणे, स्टोव आणि शेगड्या, मिक्सर, कुकर दुरुस्त करणे इत्यादी. हे करीत असतांना कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण घेतलेले नाही तर, ६६.३३ टक्के लोक आजही रोजमजुरीचे कामे करून उदरनिर्वाह करीत आहे. मजुरीचे काम संपले की, एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी भटकंती करीत असते म्हणून आजही भराडी समाज मोठ्याप्रमाणात आर्थिकदृष्ट्या मागासलेले आहे. हे या सर्वेक्षणावरून स्पष्ट होते.

**3) सामाजिक स्थिती:-**

भराडी समाज भटकंतीमुळे शिक्षणापासून वंचित राहिला. तो समाज शिक्षणापासून वंचित असल्यामुळे त्यांच्या जिवनात अंध-विश्वास व अंधश्रद्धा जास्त प्रमाणात दिसून येते, तो समाज गावापासून दूर राहत असल्याने त्यांच्या वस्तीमध्ये दिवा-बत्तीची सोय नाही. भटकंती व आर्थिक दारिद्र्यामुळे स्वतःचे घर बांधू शकत नाही. हक्काची जागा नसल्यामुळे शासनाचे घरकुल मिळत नाही. दूरवरून पिण्यासाठी पाणी आणावे लागते. त्यांच्यात प्रेम विवाहाला मान्यता नसली तरी काही प्रमाणात बालविवाह आढळून येते, परंतु विवाह जुळवतानी वधू पित्याकडील मंडळीला वधूमूल्य देण्याची प्रथा आहे. विवाह मुलींच्या घरी केला जातो. त्या समाजामध्ये मृत व्यक्तीला माती देण्याची पद्धत आहे. त्या ठिकाणी एक दगड ठेवुन तिन दिवसांनी त्या दगडाला शेंदूर लावल्या जाते. एक वर्षानंतर मृत व्यक्तीला चांदीच्या धातूने घडविले जाते त्यांच्यात महिला चांदीच्या पाटल्या, चाळ व चांदीच्या बीऱ्या वापरतात. (प्रत्यक्ष मुलाखत)

असे असले तरी भराडी समाजातील लोक गावाच्या शेजारी राहात असल्यामुळे त्यांच्यात बराच बदल होत आहे.

**उपाययोजना :-**

१) भराडी समाजातील मुला मुलींना पहिली ते पदवी पर्यंत मोफत शिक्षणाची सोय करावी.

२) त्यांचे शिक्षणातील गळती चे प्रमाण थांबविण्यासाठी निवासी शाळा व खाजगी शाळेत मोफत प्रवेश देणे.

३) भराडी समाजातील मुला-मुलींना शाळेत प्रवेश घेण्यासाठी जन्माच्या दाखल्याची सक्ती करू नये.

४) शिक्षकांनी मूल-मुली शाळेत न येण्याची कारणे शोधून, त्याचे निराकरण करून त्यांना शाळेत येण्यास प्रोत्साहन देणे.

५) पहिली पासून ते पुढील शिक्षणापर्यंत सर्वसामान्य मुलांपेक्षा जास्त शिक्षण भत्ता देण्यात यावा.

६) दहावी नंतर शिक्षण घेत असलेल्या मुला-मुलींना जातीच्या प्रमाणपत्राची अट शितील करावी किंवा शाळेतच त्यांच्या जातीच्या नोंदीच्या आधारावर जात प्रमाणपत्र देण्यात यावे.

७) मनरेगा योजनेच्या माध्यमातून मजुरांना कामे व रोजगार उपलब्द करून देणे.

८) भराडी समाजातील लोकांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी मदत व पुनर्वसन करणे, राहण्यासाठी जागा व पक्की घरे बांधून देणे.

९) उदरनिर्वाहासाठी आणि स्थायिक होण्यासाठी त्यांना शिलिंगची शेत-जमीन देणे.

१०) शेती करिता लागणारे अवजारे, बी-बियाणे, खते, विहिर, मोटरपंप, बैलजोडी इत्यादी साहित्य मोफत देण्यात यावे.

११) भराडी समाजातील लोकांचा आर्थिक विकास घडून आणण्यासाठी आणि स्वतंत्र व्यवसायासाठी दीर्घ मुद्दतीचे कर्ज द्यावे. ते ही बिनव्याजी देण्यात यावे.

१२) या जमातींना एकाही शासकीय योजनेचा लाभ घेता येत नाही. त्याविषयी जनजागृती करण्यात यावी.

१३) भराडी समाजातील लोकांना व कुटुंबांना आधार कार्ड व रेशन कार्ड उपलब्द करून देणे.

१४) सध्या ज्या ठिकाणी वास्तव्य करीत आहे त्याच ठिकाणी हक्काची जागा आणि घरकुल बांधून देण्यात यावे.

१५) राहत असलेल्या ठिकाणी वीज, पाणी, रस्ते, आरोग्य इत्यादी नागरी सुविधा पुरविण्यात याव्या.

१६) भराडी समाजातील कुटुंबात अपत्यांची संख्या जास्त आहे ती कमी करण्यासाठी कुटुंब नियोजना संदर्भात जनजागृती करणे.

१७) भराडी जमातीचे प्रबोधन करून अनिष्ठ प्रथा परंपरेतून मुक्त करणे.

**निष्कर्ष –**

भराडी भटक्या जमातीतील मुलांची शैक्षणिक स्थिती पाहत असतांना ७० टक्के मुल शिक्षणापासून वंचित आहे. त्या जमातीच्या सरकारी शाळा पुरेशा उपलब्ध नाही. अती दारिद्यामुळे ते खाजगी शाळेत शिक्षण घेऊ शकत नाही. शिक्षणविषयक जागृती त्या समाजात फारसी झालेली नाही. सततच्या भटकंतीमुळे शिक्षणातील गळतीचे प्रमाण सर्वाधिक आहे. शिक्षणाचे आकर्षण नसल्यामुळे अनेक मुले शाळेत जात नाही अनेक मुलांना शिक्षण हक्क कायद्याची माहिती नाही, नाथजोगी समाजातील मुल शिकत असतांना शाळेत शिक्षक व विद्यार्थ्यांकडून भेदभावाची वागणूक दिली जात असल्याचे सांगतात, अनेक पालक व विद्यार्थ्याकडे जन्माचा दाखला व जात प्रमाणपत्र नसल्यामुळे ते शाळेत प्रवेश व सवलतीचा लाभ घेऊ शकत नाही. दारिद्रयामुळे दर्जेदार शिक्षण घेऊ शकत नाही किंवा चांगल्या शाळेमध्ये प्रवेश घेऊ शकत नाही. कुटुंबात अपत्याची संख्या बरीच मोठी असल्यामुळे प्रत्येकाना शिक्षण देऊ शकत नाही. भराडी समाजाची बोलीभाषा इतर भाषापेक्षा वेगळी असल्यामुळे मुलांचे शाळेत व शिक्षणात लक्ष लागत नाही. भराडी समाजातील लोकांकडे स्थायी होण्यासाठी जमीन नाही, काही लोकांकडे जमीन आहे पण कसण्यासाठी पुरेसे साधने उपलब्ध नाही तेव्हा ते लोक स्वतःचे व कुटुंबाचे पोट भरण्यासाठी भविष्य पाहणे, शेळी पालन, शेगडी, स्टोव, कुकर व गोणे शिवणे इत्यादी व्यवसाय करतात परन्तु हे सर्व व्यवसाय करतांना कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण घेतलेले नाही. रोजमजुरी करतांना मालक त्यांना कमी मजुरी देऊन त्यांचे आर्थिक शोषण करतात. सततच्या दारिद्यामुळे भराडी समाजाची सामाजिक परस्थिती अत्यंत गरिबीची आहे. सतत भटकंतीमुळे त्यांच्याकडे स्वतःची जागा व पक्के घर नाही, सरकारी स्वस्त धान्य मिळावे म्हणून त्यांच्याकडे राशन कार्ड नाही, अनेक लोकांकडे आधार कार्ड नाही, अशिक्षित असल्यमुळे अंधश्रद्धा व अंधविश्वास या सारख्या समस्या त्यांच्यात आहे.

**संदर्भ सूची :-**

*चौधरी, भारताचे संविधान, लॉ पब्लिशर्स, पुणे.

*विलास वाघ, समाज प्रबोधन पत्रिका, समाज प्रबोधन संस्था, पुणे. (अंक जून २०१७)

* शैलेश खरात, समाज प्रबोधन पत्रिका, समाज प्रबोधन संस्था, पुणे. (जुलै २०१८)

*समाजशास्त्र संशोधन पत्रिका, विशेषांक डिसेंबर २०१९

* रा. ज. लोटे, भारतीय समाज आव्हाने आणि समस्या, पिंपळापुरे पब्लिशर्स, नागपूर.

* प्रदीप आगलावे, भारतीय समाज संरचनात्मक प्रश्न आणि सामाजिक समस्या, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

*समाजशास्त्र संशोधन पत्रिका – मार्च २०१५, २०१६

*www.maxmaharashtra.com

*mr.m.wikpedia.org

*रामनाथ चव्हाण, देशमुख, भटक्या –विमुक्तांची जात पंचायत, खंड ५, आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा. ली. ४७३, सदाशिव पेठ,पुणे

*Kartvyasadhana.in

*लोकमत दैनिक, सकाळ दैनिक, लोकसत्ता दैनिक,देशोन्नती दैनिक

*www.wardha.nic.in